PWDVA 18.2025 along with Exh.01
Order
Seen and Filed.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.07.03 16:17:55 +0530

JMFC, Ghodegaon

घोडेगाव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी सो,

यांचे न्यायालयात

फौ.की.अर्ज-   /२०२५.

सौ.अश्विनी रवि ताते. ------------------ **अर्जदार**

विरुध्द

श्री.रवि संजय ताते व इतर ४ --------------------जाबदेणार

ऑफिडेव्हिट

अश्विनी धोंडू धराडे (लग्नापूर्वीचे नाव)

मी.**सौ.अश्विनी रवि ताते.**वय-२७ वर्ष,धंदा-काहीही नाही.रा.द्वारा-श्री धोंडू तुळशीराम धराडे. मु/पो-कुशिरे खुर्द, ता-आंबेगाव,जिल्हा-पुणे.सत्य प्रतिज्ञेवर कथन करिते कि,

१) मी या मे.कोर्टाचे स्थळसिमेत गावमौजे कुशिरे खुर्द,ता-आंबेगाव,जि-पुणे येथे रहात आहे.म्हणून सदरचा अर्ज दाखल करून घेवून तो चालविण्याचा व त्यावर अंतिम निकाल करण्याचा या मे.कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

२) जाबदेणार नं.१ हा माझा पती असून जाबदेणार नं.२ ही माझी सासू आहे. जाबदेणार नं.३ हा माझा दीर आहे. जाबदेणार न.४ हे माझे चुलत सासरे आहे.तसेच जाबदेणार न.५ हि जाबदेणार न.१ यांची नात्याने आत्या (वडिलांची बहिण) आहे.

३) सदरचा अर्जातील हिंसाग्रस्त व्यक्ती म्हणून मी कौटूबिक हिंसेपासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२,१४,१८.१९,२०,२२ व २३ प्रमाणे दाखल केलेला आहे.सदर कौटूबिक घटनेची तक्रार/कौटूबिक घटना अहवाल यांची दखल घेण्या - बाबत विनंती करण्यात येते कि,या अर्जाचे संदर्भात योग्य असेल ते सर्व अथवा इतर कोणताही आदेश मे.कोर्टाने पारित करावा .

सदर अर्जाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे-

Asstt. Superintendent
Civil & Criminal Court
Ghodegaon

४) माझा व जाबदेणार न.१ यांचा विवाह हा समाज जन-रितीरिवाजाप्रमाणे दिनाक - १८/०७/२०१९ रोजी मु/पो-कुशिरे खुर्द, ता-आंबेगाव, जिल्हा-पुणे येथे पार पडलेला होता व आहे.सदरचा विवाह हा एकमेकाच्या पसंतीने झालेला होता व आहे. लग्नानंतर जाबदेणार नं.१ यांनी मला माळेगाव खुर्द,ता-मावळ, जिल्हा-पुणे येथे नांदण्यांस घेऊन गेलेले होते व आहेत.सदरहू वेळी जाबदेणार नं.१ यांचे घरी जाबदेणार नं.१ स्वतः, जाबदेणार नं.२ ते ४, सासरा व नणंद अनुक्रमे नामे सारिका व पूजा वगैरे असे सर्वजण एकत्रित राहू लागलात.सासरी नांदत असताना जाबदेणार नं.१ ते ७ यांनी मला लग्नानंतर सुरवातीचे एक वर्षच व्यवस्थित नांदविले. परंतु एक वर्षानंतर जाबदेणार नं.१ हा माझेबरोबर वारंवार कोणत्या ना कोणत्या कारणावरून भांडणतंटा करत असे.सदरचा विवाह झाल्यापासून जाबदेणार न.१ ते ७ यांनी मला केव्हाही माहेरी सणावाराला पाठविले नव्हते व नाही. माझे आईने जाबदेणार नं.१ ते ७ यांस , " तुम्ही माझ्या मुलीला सणावाराला माहेरी का पाठवत नाही. "अशी विचारणा केली असता, जाबदेणार नं.१ ते ७ यांनी माझ्या आईस अपशब्द वापरून तिचा अपमान केलेला होता व आहे.तसेच जाबदेणार न.१ ते ७ हे मला मानसिक व शाररीक त्रास देवून माझा छळ करत असे.मी संसार-प्रपंच होण्याच्या दृस्ठीने होणारा सर्व त्रास व छळ सहन केला.परंतु जाबदेणार नं.१ ते ७ यांच्या वागनेत काडीमात्र फरक अथवा बदल झालेला नव्हता व नाही. तसेच जाबदेणार नं.१ हा घरात किराणा न भरणे, मला कपडेलत्ते न पुरवणे, माझी पत्नी ह्या नात्याने कोणतीही काळजी न घेणे यासारखे गैरकृत्य करत असे.तसेच जाबदेणार न.१याने मला कोणत्याही प्रकारचे संसारिक व प्रापंचिक सुख दिलेले नव्हते व नाही.

Asstt. S
Civil & (

५) तसेच लग्न झालेनंतर दोन महिन्यांनी जाबदेणार नं.१याने माझ्या बरोबर छोट्या– छोट्या कारणावरून भांडणतंटा करून मारहाण करण्यास सुरुवात केली. जाबदेणार नं.१ ते ५ हे माझ्याकडून अंगमेहनतीची कामे करून घेत असत.मी जर आजारी पडली तर जाबदेणार नं.१ हा मला औषधोपचार करण्याकरिता दवाखाण्यात घेवून जात नसे.तसेच जाबदेणार नं.२ ह्या माझेत व जाबदेणार नं.१ यांच्यामध्ये गैरसमज निर्माण करून भांडणे लावून देण्याचे काम करत असे.तसेच जाबदेणार न २ ह्या जाबदेणार नं.१ यांस ,“ तुझ्या सासऱ्याकडून काय भेटलं,गेल्यावर कधी चहा पण विचारात नाही, लग्नात काहीही दिले नाही, भिकारी आहेत तुझ्या सासर-वाडीचे लोक असे म्हणून वारंवार हिणवत असे.” सदरील जाबदेणार नं.२ चे हे बोलणे ऐकून जाबदेणार नं.१ हा मला वारंवार मारहाण करत असे.

६) मला जाबदेणार नं.१ पासून दिवस गेलेले असताना म्हणजेच गरोदरपणात जाबदेणार नं.१ ते ५ यांनी माझी कोणतीही काळजी घेतलेली नव्हती व नाही. तसेच जाबदेणार नं.२ ते ४ हे मला गरोदरपणातच कष्टाची कामे करायला लावत असत. सदरच्या अंगमेहनतीच्या कामामुळे मला गरोदरपणात खूप मानसिक व शाररीक व्याधिना सामोरे जावे लागलेले होते व आहे.तसेच सदर जाबदेणार न.१ याने मला केव्हाही उपचारासाठी डॉक्टरकडे दवाखान्यात घेवून गेलेले नव्हते व नाही. तसेच माझे गरोधरपणात केव्हाही वेळेत औषधोपचार केलेला नव्हता व नाही.जाबदेणार न.१ ते ४ यांनी गरोधरपणात माझी कोणतीही काळजी न घेतल्यामुळे त्याचा परिणाम माझे शाररीक व मानसिक स्वास्थ्यावर झालेला होता व आहे.तसेच माझी प्रस्तुती हि माझे आई-वडिलांनी त्यांच्या घरी म्हणजेच गावमौजे कुशिरे खुर्द, ता-आंबेगाव,जिल्हा–पुणे येथे केलेली होती व आहे.तसेच सदर जाबदेणार न.२ याने त्यांची मुलगी आर्वी यांस त्यांचेकडे म्हणजेच गावमौजे माळेगाव खुर्द, ता-मावळ,

Superintendent
Criminal Court

जिल्हा-पुणे येथे घेवून गेलेले होते व आहे.परंतु जाबदेणार न.१ते ४ यांनी माझे गरोधरपणात कोणतीही काळजी न घेतल्यामुळे तसेच कोणतेही वैद्यकीय उपचार वेळेत न घेतल्यामुळे माझी मुलगी आर्वी हिचा जन्म झाल्यानतर २ महिन्यानंतर ती मयत झालेली होती व आहे.

७) जाबदेणार नं.१ हा मला शाररीक व मानशिक त्रास देवून माझा छळ करत असे. मी सदरची गोष्ठ माझे माहेरी आईला सांगितली असता आईने मला समजावून सांगून नांदण्यास सांगितलले होते व आहे.

८) मी सासरी नांदत असताना जाबदेणार नं.१ याने कधीही पती या नात्याने कोणतीच जबाबदारी पार पडलेली नव्हती व नाही.मला अंग झाकण्याकरिता पुरेसा कपडेलत्ता देखील देत नसत, मी माझ्या आईकडून जुन्या साड्या आणून त्याच अंगावर घालत असे परंतु जाबदेणार नं १ ते ५ यांना माझी कोणतीही दया आलेली नव्हती व नाही.

९) मी सासरी नांदत असताना जाबदेणार न.१ याने माझी देखभाल,काळजी घेतलेली नसून मला दिवस-दिवस उपाशी ठेवून माझा शाररीक व मानशिक छळ करून मला संसारिक-प्रापंचिक सुखापासून वंचित ठेवलेले होते व आहे.

१०) तसेच मला जाबदेणार न.१ यांचेपासून पुन्हा म्हणजेच दुसऱ्यांदा गरोधर असताना जाबदेणार न.१ व त्याचे घरातील लोकांनी माझी कोणतीही काळजी घेतलेली नव्हती व नाही.तसेच वेळेत औषधोपचार केलेला नव्हता व नाही. माझी प्रसूती ही माझे सासरी झालेली होती व आहे.सदर प्रसूतीचा झालेला खर्च हा माझे आई-वडिलांनी कर्ज काढून केलेला होता व आहे.सन २०२३ मध्ये मला गरोधरपणा -मध्ये जाबदेणार न.१ ते ५ यांनी खूप त्रास दिलेला होता व आहे.माझी प्रसूती झाली प्रसूतीमध्ये माझे खूप हाल झालेले होते. त्यामुळे डॉक्टरांनी माझे आय.सी.यु मध्ये ठेवण्यास सांगितलेले होते व आहे.सदर काळात जाबदेणार न.१ ते ५ यांनी माझी

Asstt. Sup

कोणतीही चौकशी केलेली नव्हती व नाही.तसेच मी दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामुळे मला माझ्या मुलापासून वेगेळे ठेवलेले होते व आहे.तसेच जाबदेणार न.१ ते ५ यांनी सदर मुलाला माझेपासून वेगळे ठेवल्यामुळे व मुलाला आईचे अंगावरचे दूध न मिळालेमुळे सदर मुलगा जास्त आजारी पडलेला होता व आहे. सदर वेळेस डॉक्टरांनी जाबदेणार न.१ ते ५ यांना , "तुम्ही मुलाला आईजवळ ठेवा." असे सांगितले असता जाबदेणार न.१ ते ५ यांनी डॉक्टर यांचे काहीही एक न एकता सदर मुलाला त्यांचेबरोबर गावमौजे माळेगाव खुर्द, ता –मावळ, जिल्हा –पुणे येथे घेवून गेलेले होते व आहे.जाबदेणार न.१ ते ५ यांनी माझे मुलाला घेवून गेल्यानंतर सदर ठिकाणी माझी कोणतीही काळजी न घेतल्यामुळे मुलगा मयत झालेला होता व आहे. सदर गोष्ठ हि जाबदेणार न.१ ते ५ यांनी मला व माझे माहेरकडील लोकांपासून लपवून ठेवलेली होती व आहे.सदर गोष्ठ मला समजल्यानंतर मला खूप मोठा शाररीक व मानशिक धक्का बसलेला होता व आहे. मी सदरील मानशिक धक्का न पचवू शकल्यामुळे त्यांचा परिणाम माझे मेंदूवर झालेला होता व आहे.तद्नंतर डॉक्टरानी माझे मेंदूचे तातडीने ऑपरेशन करावयास सांगितलेले होते.परंतु जाबदेणार न.१ ते ५ यांनी माझी व माझे आजाराची व डॉक्टरांनी करावयास सांगितलेले मेंदूचे ऑपरेशनची कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही. सदर जाबदेणार न.१ ते ५ हे मला हॉस्पिटलला घेवून गेलेले होते व आहे. त्यानंतर माझे माहेरकडील लोकांनी त्यांची आर्थिक परिस्थिती नसताना लोकांकडून हातउसने पैसे घेवून ,कर्ज काढून माझ्या डोक्याची एका बाजूची कवटी काढून मेंदूचे ऑपरेशन केलेले होते व आहे. तेव्हापासून सदर जाबदेणार न.१ ते ५ यांनी माझी कोणतीही चौकशी अथवा विचारपूस केलेली नव्हती व नाही.तसेच माझी कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही.तसेच मला सदर ऑपरेशन करण्यास रक्कम रुपये-५,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच लाख रुपये) इतका खर्च आलेला होता

Intendent

व आहे. तसेच आजमितीसही प्रत्येक महिन्याला औषधोपचार चालू असून प्रत्येक महिन्याला खूप मोठा खर्च येत असून सदर खर्च करण्याची माझी परीस्थीती नाही.मी माझे माहेरी दुख:मय जीवन कंठत आहे.

११)मला जाबदेणार न.,१ याने नांदविण्यास घेवून जाण्याबाबत अनेकदा नातेवाईक, मध्यस्थी यांचेमार्फत बैठकी झाल्या.परंतु जाबदेणार नं.१ यांनी सदरील बैठकीत देखील शिव्यागाळ करून मला मारहाण केली व आजही मला फोन करून फोनद्वारे शिव्यागाळ करून अपशब्द वापरत आहे.जाबदेणार नं.१ याने माझी साधी विचारपूस अथवा चौकशी देखील केलेली नव्हती व नाही. मी नातेवाईक व मध्यस्थी मार्फत नादविण्यास नेण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु जाबदेणार नं १ ते ५ यांनी मला नादविण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिलेला होता व आहे.तेव्हापासून मी माहेरी अतिशय दुख:मय जीवन कंठत आहे.

१२) जाबदेणार नं.१ ने माझी कोणतीही चौकशी न करता स्वेछेने त्याग केलेला आहे.माझा मानसिक व शारीरीक छळ केलेला आहे.मला जगणे असह्य झालेले असून मला आज रोजी उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. मी स्व:ताचा संभाळ व पालनपोषण करणेस असमर्थ आहे.मी सदर अर्जामध्ये कलम २० नुसार, नुसकानी बद्दलची रक्कम व पोटगीची रक्कम मागितलेली आहे व ती देण्याची जाबदेणार याची ऐपत आहे.कारण जाबदेणार यांची गावमौजे माळेगाव खुर्द, ता-मावळ,जिल्हा-पुणे येथे ५ एकर शेतजमीन आहे. त्यामध्ये जाबदेणार नं.१ ते ४ हे जिरायती व बागायती पिके घेत आलेले होते व आहेत. सदर शेतीच्या उत्पन्नातून जाबदेणार न.१ हा दरसाल पाच लाखाचे पुढे उत्पन्न घेत आहे.तसेच जाबदेणार नं. १ यांचेकडे २ बैल व ३ दुभती गाई असून सदर दुधाचे उत्पन्नापासून जाबदेणार न.१ यांस प्रतिमहा रक्कम रुपये-५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच हजार रुपये) इतके उत्पन्न मिळते.तसेच जाबदेणार न.१ हा एका नामांकित कंपनीमध्ये कामाला असून सदर

नोकरीतून त्यांस प्रतिमहा रक्कम रुपये-१५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार रुपये फक्त)इतके उत्पन्न मिळते. जाबदेणार नं.१ ते ५ हे शरीराने धडधाकट असून शेती व्यवसाय करून शेतातून सालोसाल उत्पन्न घेत आलेले होते व आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार याची आर्थिक परिस्थिती अतिशय सधन आहे. त्यामुळे माझ्या मागणीप्रमाणे नुसकान भरपाईची व पोटगी देण्याची जाबदेणाराची ऐपत आहे. जाबदेणार नं.१चे घरातील सर्व लोक कामविते असून जाबदेणार नं.१.वर कुणीही अवलंबून नाही.त्याची महिना १०,०००/-देण्याची ऐपत आहे.

१३) वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार यांनी माझेवर खूपच घरगुती जुलूम केलेला आहे.व आजही त्यास पश्याताप होत नाही.त्यामुळे मला माझ्या भविष्यातील आधारासाठी म्हणून मी कलम २२ नुसार मानसिक,त्रास,भावनिक दु:ख या बद्दल नुकसान भरपाई देखील जाबदेणार यासकडून मागितलेली आहे.

१४) मला जाबदेणार याने नेसत्या वस्त्रानिशी अंगावरील सर्व दागिने काढून घेवून घरातून हाकलून दिले.माझे सर्व स्त्रीधन हे जाबदेणार याकडे आहे. मला पुढील भविष्यासाठी माझी स्त्रीधनाची पुढीलप्रमाणे मागणी करत आहे.

<u>माझे अंगावर घातलेले दागिने.</u>

१)मंगळसूत्र १ तोळे

२.जोडवी

३.पैंजण .

४.अंगठी.

<u>संसार उपयोगी भेट वस्तू</u>

१)स्टील मांडणी १

२)कपाट-१

३)बेड -१ नग.

४)पाट -२नग.

५)झाडू -१ नग.

६)टोपली -१ नग

७)हंडा - ४ नग.

८) कळशी १

९)ताट -६ नग

१०)डिश -६ नग

११)ताबे -६ नग

१२)ग्लास -६ नग.

१३)स्टील डबे - ६ नग

१४)मोठे डबे- २ नग

१५)बादली -२ नग.

१६)स्टील टोप-६ नग.

१७) बरण्या -६ नग.

१८)परात-२ नग

१९)पेले-६ नग.

२०)वाट्या -६ नग

२१)चमचे -६ नग.

२२)चमचा कलथा,भात उकरी प्रत्येकी -१ नग.

२३)किटली -१ नग.

२४)किसणी -१ नग.

२५)मसाला डब्बा-नग.

२६)कढई-१ नग.

२७)तवा -१ नग.

२८)विळी-१ नग.

२९)मिक्सर १ नग.

३०)पळपट-१ नग.

३१)कपबशी-१ नग.

३२)कन्यादानाची पाच भांडी – ताम्हण,गडू,ताट,समई,ताब्या,कृष्ण

३३)तोरण-१

वरील सर्व वस्तूची अंदाजे किमत रुपये-१,००,०००/-व लग्नाचा खर्च व जाबदेनाराकडील पाहुण्याचा मानपानाचा खर्च रुपये-२,००,०००/-व बाकी खर्च

Asstt. Supt.
Civil & Cri

१,००,०००/-असा एकूण खर्च रुपये ४,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये चार लाख रुपये फक्त).

१५) **<u>अर्जास कारण</u>** – दिनांक-१९/०७/२०१९ पासून ते जून २०२५ पर्यंत जाबदेणार यांनी माझा अतोनात असा कौटुंबिक छळ केला व मला नेसत्या वस्त्रानिशी हाकलून देवून नांदविण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला.त्यावेळी प्रथम घडले व आजही घडत आहे.

१६) मी या आधी या मे.कोर्टात अथवा अन्य कोणत्याही कोर्टात या प्रकारचा अर्ज दाखल केलेला नाही.

१७) **<u>माझी मे.न्यायालयास विनंती कि,</u>**

अ) लग्न सोहळ्याचा खर्च रुपये ४,००,०००/-(अक्षरी चार लाख रुपये फक्त)जाबदेणार यासकडून मला मिळावा.

ब) जाबदेणार याने वर नमूद केल्याप्रमाणे माझ्यावर कोणतेही वाजगी व सयुक्तिक कारण नसताना अतोनात घरगुती जुलूम करून मला मानसिक व शारीरिक त्रास दिला.त्यामुळे मला भावनिक दु:ख झाले त्याबद्दल नुसकान भरपाई म्हणून रुपये-२,००,०००/-(अक्षरी दोन लाख रुपये फक्त) जाबदेणार यासकडून मला मिळण्याचा हुकुम व्हावा.

क) माझे स्त्रीधन अथवा त्याची बाजारभावाप्रमाणे होणारी रक्कम रुपये १,५०,०००/-(अक्षरी एक लाख पन्नास हजार रुपये फक्त) जाबदेणार यासकडून मला मिळण्याचा हुकुम व्हावा.

ड) माझी जाबदेणार नं.१ ने राहण्याची सोय करावी अगर मला दरमहा रक्कम रुपये-३,०००/-(अक्षरी रक्कम रुपये तीन हजार रुपये) प्रतिमहा घरभाडे म्हणून जाबदेणार नं.१ कडून मिळण्याचा हुकुम व्हावा.

Superintendent
...inal Court

इ) सदर अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये तीस हजार) जाबदेणार यांसकडून मला मिळावा

ई) सदर अर्जाची बजावनी जाबदेणारांवर सुरक्षा अधिकारी मार्फत करण्यात यावी. सदर प्रकरणी सुरक्षा अधिकार्यांचा अहवाल मागविण्यात यावा.

फ) अर्ज दाखल केले पासून मला जाबदेणार नं.१ कडून दरमहा रक्कम रुपये-१०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दहा हजार रुपये)अन्न,वस्त्र,पोटगी व इतर दैनदिन गरजेकारिता पोटगीच्या स्वरुपात द्यावेत असा हुकुम करण्यात यावा.

ग) इतर योग्य व न्याय हुकुम माझे लाभात करण्यात यावे.तसेच जरूर तर अर्ज दुरुस्तीची परवानगी असावी.

वर कलम १ ते १७ मध्ये कथन केलेला सर्व मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेकामी मी घोडेगाव मुक्कामी त्यावर माझी सही केली असे.

घोडेगाव.

दिनाक- २४/०६/२०२५

ऑफिडेव्हिट करणार

मी ऑफिडेव्हिट करणाऱ्यास ओळखतो

(सौ.अश्विनी रवि ताते)

(डी.व्ही.लोहोटे.)

Affidavit
...lemnly affirmed before me
...amely Shri./Smt.
who is identified before me
by Shri./Smt.
Advocate
Asstt. Superintendent
Civil & Criminal Court
Ghodegaon